# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 244 / 2023 दिनांक : 23.06.2023**

फिर्यादी नामे दत्त संस्थान सरेगाव ता. मुदखेड येथे मठाधिपती असुन ते दिनांक 22.06.2023 रोजी त्यांचे कामानिमित्त नांदेड येथे आले होते. नांदेड येथील काम संपवुन दुपारी अंदाजे साडेतीन वाजताचे सुमारास सरेगाव येथे जात असतांना ते आसना ब्रिज जवळ आले असता मो सा क्रमांक एमसच–26 / बीयु–4132 वरील दोन इसमांनी विनाकारण फिर्यादीस शिवीगाळ करू लागले तेंव्हा फिर्यादीने आरोपीस मला विनाकारण शिवीगाळ का करता असे म्हणाले असता आरोपीतांनी फिर्यादीचे मोटार सायकलची चावी काढुन फेकुन दिली. व लाथा बुक्याने मारहाण करून व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे तक्रारी वरून पोस्टे विमानतळ गुरन क्रमांक 461 / 2023 कलम 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेवुन दोन आरोपींताचे नाव निष्पन्न केले. आरोपी **1.सुमेध शामराव पवार, वय 23 वर्षे, रा. येळी ह. मु. भोकर 2. नागेश पांडुरंग फुगवे, रा. सायाळ, ह. मु. गोविंद कॉलनी नांदेड** असे निष्पन्न केले असुन आरोपीच्या शोधासाठी पोस्टे विमानतळ पोनि **श्री साहेबराव नरवाडे**, यांनी पोस्टे भोकर पोनि, यांचेशी संपर्क साधण्यात आला. व पोस्टे विमानतळ येथील डिबी पथकातील सपोनि जाधव, पोहेकॉ राठोड, पोना कलंदर, पोकॉ गंगावणे यांनी सदर आरोपीचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री आबिनेश कुमार,** अपर पोलीस अधिक्षक नांदेड , **मा. श्री सुरज गुरव**, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री साहेबराव नरवाडे, पोनि पोस्टे विमानतळ व त्यांचे गुन्हे शोध पथकांनी पार पाडली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड